# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई- 400 013.

**<u>क्र. सहा.अभि.(घकव्य)/जीद/ 14140 / दि.01.02.2024</u>**

## <u>स्वारस्याची अभिव्यक्ती (E.O.I.)</u>

**विषय :- 'जी/दक्षिण' विभाग हद्दीतील स्वच्छतेचे स्तर लोकसहभागातून उंचविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर "स्वच्छता दूत योजना" राबविण्याबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'जी/दक्षिण' विभाग कार्यक्षेत्रात रस्त्यावरील पदपथावर व सार्वजनिक ठिकाणी उत्तम दर्जाची स्वच्छता ठेवण्यासाठी **"स्वच्छता दूत योजना"** राबविण्याकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती (E.O.I.) स्विकारण्यासाठी अर्ज मागवित आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर स्वारस्याची अभिव्यक्ती (E.O.I.) संदर्भात तपशीलवार माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ईच्छूक बेरोजगार सेवा सहकारी संस्थांनी "स्वच्छता दूत योजना" करीता अर्ज पूर्णपणे भरून त्यासोबत संबंधित कागदपत्रे जोडून सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, जी/दक्षिण विभाग कार्यालय, दुसरा मजला, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, प्रभादेवी, मुंबई - 400 013 यांच्याकडे सादर करावे.

स्वारस्याची अभिव्यक्ती (E.O.I.) अर्ज विक्रीसाठी विभागातील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) 'जी/दक्षिण' विभाग यांचेकडे ठेवण्यात आले आहेत. (अर्जाचे शुल्क **रु.3,540** (रु.3,000/- अधिक GST 18% असे आहे.) अर्ज दिनांक **03.02.2024** ते दिनांक **09.02.2024** पर्यंत कार्यालयीन वेळेत शनिवार / रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील. दिनांक **10.02.2024** रोजी **दुपारी 01.00** वाजेपर्यंत स्वारस्य अभिव्यक्तीचे अर्ज मोहोरबंद लिफाफा **"स्वच्छता दूत योजना"** असे लिहून या कार्यालयात सादर करावयाचे आहे. प्राप्त अर्जांची छाननी / पडताळणी करून पात्र संस्थांची यादी संबंधित 'जी/दक्षिण' विभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

ऐच्छिक / विनामानधन तत्वावर स्वच्छता दूत म्हणून जबाबदारी स्विकारु इच्छीवणा-या व्यक्ती / संस्था यांनी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)**

**जी/दक्षिण विभाग**